**दि.दावा क.२१३/२०१२**
**नि.क.४१**

**वादीचा साक्षीदार क. १ उरर्वरित उलटतपास प्रतिवादी क. १ व २ तर्फे ॲड. श्री. जी.आर.हुंगे यांच्या मार्फत:**

माझ्या वडीलांना मिळालेली शेतजमीन ही मौजा रानमांगली, त. भिवापूर,जि.नागपूर, येथे आहे. सदर जमीन कोरड वाहु होती. आता सदर जमीन ओलीत आहे. सदर जमीन ही सन २०१३ पासुन पूर्णपणे ओलीत झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे शपथपत्र सन २०१९ मध्ये दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की माझे शपथपत्रातील परिच्छेद क.२मध्ये नमुद केलेले वाक्य " जमीन आताही कोरडवाहु आहे'' हे खोटे आहे. माझे वडील शिक्षक होते. माझे वडील सन १९७२ साली सेवानिवृत्त झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांना प्राप्त झालेली जमीन ते स्वत: बघत होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीन माझा भाऊ प्रकाश हा बघत होता. सदर जमीन मी बघत होतो हे दाखविण्याकरिता त्याचा महसुल उतारा मी दाखल केलेला आहे. साक्षीदाराने अभिलेख तपासून त्यानंतर पुरावा या केसमध्ये दाखल नसुन तो भिवापूरच्या केसमध्ये दाखल केला आहे असे सांगितले आहे. भिवापूरच्या केसमध्ये ७/१२ उतारा दाखल केला आहे त्यावर कब्जा वहीवाटदार म्हणून माझे नाव आहे. सदर ७/१२ उतारा मी पुढील तारखेस अभिलेखावर दाखल करण्यास मी तयार आहे.

**प्रतिवादी क. १ व २ तर्फे ॲड. श्री. जी.आर.हुंगे यांच्या तोंडी विंनती वरुन सदरचा उतारा दाखल करेपर्यंत उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

वा.दा.ब.अ.क.केले. समक्ष,

दि.न्या क.स्तर.
उमरेड

(जा.म. मिस्त्री)
प्रभारी २रे सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
उमरेड.
दि.१४.०९.२०२१.